-: प्रेस नोट :-

विश्रांतवाडी पोलीस स्टेशन पुणे तसेच पुणे शहर पोलीस आयुक्तालयातील बहुतांश पोलीस स्टेशनच्या हद्दीमध्ये रात्रीच्या वेळी रोडवर व घरा समोर पार्क केलेल्या चार चाकी वाहनाच्या काचा फोडून वाहनातील कारटेप व म्युझिक सिस्टीम्स चोरीला गेल्याबाबत गुन्हे दाखल आहेत.

विश्रांतवाडी पोलीस स्टेशनचे हद्दीमध्ये दि:-२६/०२/२०१८ रोजी रात्रो ०२.०० ते ०४.०० वा.चे दरम्यान दं चार चाकी वाहनाच्या काचा फोडून दोन पायोनिअर कंपनीचे कारटेप चोरी गेल्याने गुन्हा दाखल झाला. गुन्ह्याच अनुषंगाने तपास चालु करुन घटनास्थळावरील व चोरी झाल्यानंतर त्या मार्गाने जाणा-या सर्व रस्त्यावरील सीसीटिव फुटेज तपासले.परंतु काहीएक उपयुक्त माहीती मिळुन आली नाही.

त्यानंतर विश्रांतवाडी पोलीस स्टेशनचे हद्दीत तसेच पुणे शहरामध्ये वारंवार अशा प्रकारचे गुन्हे घड असल्याने मा.श्री दिपक साकोरे, पोलीस उपआयुक्त,परि-४, पुणे व मा.श्री गणेश गावडे, सहा.पो.आयुक्त, खडक विभाग, पुणे यांचे मार्गदर्शनाखाली संगीता पाटील, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, विश्रांतवाडी पो.स्टे.पुणे यांनी विश्रांतवा पो.स्टे.चे तपास पथक अधिकारी पोउपनि विशाल मोहिते व कर्मचारी यांची सदर कारटेप चोरीच्या गुन्ह्यांची उक करण्यासाठी वेगवेगळी पथके तयार करुन त्यांना मार्गदर्शन केले.

तपासा दरम्यान सदरचे गुन्हे हे ठराविक दिवशी व ठराविक वेळीच घडत असल्याचे निदर्शनास आलेने त अनुषंगाने तपासाची दिशा ठरवुन तपास केला असता, एक चार चाकी वाहन ठराविक दिशेने येवुन गुन्हे करुन ज असल्याचे दिसुन आले. मा.वरिष्ठांना त्याबाबत माहीती दिली असता, मा.पोउपआयुक्त, परि-४ व मा.सहा.पो.आयुक खडकी विभाग, पुणे यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक, व पोलीस निरीक्षक(गुन्हे) विश्रांतवाडी पो.स्टे.पु यांनी दि:-२५/०३/२०१८ रोजी विश्रांतवाडी पो.स्टे.हद्दीत प्रवेश करणारे व हद्दीतुन बाहेर जाणा-या सर्व मार्गावर रा १२.०० ते पहाटे ५.०० या वेळात सापळा लावला असता,रात्रो ०२.३० वा.चे सुमारास एक संशयीत कार साप्रस कड विश्रांतवाडी कडे भरधाव वेगाने जाताना स्टाफला दिसली. सदर कारचा अधिक संशय आलेने स्टाफने तिचा पाठला केला असता, सदरची कार ही विश्रांतवाडी मार्गे दिघीच्या दिशेने भरधाव वेगात निघुन गेली. गुप्त बातमीदारामार्फत तांत्रिक मदतीने सदर कारचा नंबर ट्रेस करुन त्या अनुषंगाने कारचे मालक शोधुन नमुद कारचा सध्याचा माल शोधुन त्याचेकडे चौकशी करता, सदरची कार ही त्याचा नातेवाईक साहील कुरेशी रा.मुंबई याचे ताब्यात असल्या निष्पन्न झाले. त्या अनुषंगाने साहील कुरेशी रा मुंबई याची गोपनिय माहीती काढून बातमीदारामार्फत माहीती मिळव त्याचा मुंबई येथे शोध घेत असताना तो मिळुन आला नाही. परंतु त्याचा साथीदार नामे-**मोहमद जाहीद लोहार व ४१ रा.१३१/२, पो.कैला-२ तहसिल जि.गाजीयाबाद,उत्तर प्रदेश**.हा दि-०३/०४/२०१८ रोजी तुर्भे नवी मुंबई ये मिळुन आलेने त्याला ताब्यात घेवुन दाखल गुन्ह्यात तो निष्पन्न झालेने त्यास अटक करुन त्याचेकडे तपास करत त्याने त्याचे इतर साथीदार साहील कुरेशी व अक्लाख शेख यांनी मिळुन कारटेप चोरीचे पुणे शहर व इत वेगवेगळ्या भागात अनेक गुन्हे केल्याचे सांगीतले.

आरोपीचे साथीदार साहील कुरेशी व अक्लाख शेख यांचेबाबत पो.शि ९०८९ मोरे व पो.शि ८३१८ आव्हा यांनी बातमीदारा मार्फत गोपनिय माहीती काढली असता सदर आरोपी हे दि.०३/०४/२०१८ रोजी सायं.१७.४० वा. सुमारास १०० एकर, धानोरी या ठिकाणी मोटार सायकलवर येणार असल्याची गोपनिय बातमी मिळाल्याने सद ठिकाणी सापळा लावला असता, एक यामाहा मोटार सायकल नं- MH-01-AS-4907 यावरुन दोन संशयीत इसमां ताब्यात घेवुन त्यांची झडती घेता साहील कुरेशी नावाचे इसमाकडे एक देशी बनावटीचे पिस्टल व ६ जिवंत काडतु मिळुन आलेने इसम नामे-१) साहील जमील कुरेशी वय-२२ वर्षे रा.फ्लॅट नं-५०५, रॉयल रेसिडेन्सी, फेज-१, सेक्ट नं-११, तळोजा, नवी मुंबई ४३. २) अक्लाख हुसेन शेख वय-३२ वर्षे रा. व्दारा नौशाद हुसेन शेख रा.डंम्पींग रो कमला रामण नगर, गोवंडी मुंबई. मुळगाव मु.कोलही गरीब, पो.बनगवा, तहसिल मनकापुर, जि.गोंडा. उत्तर प्रदे यांचे विरुध्द विश्रांतवाडी पो.स्टे.गु.र.नं-१२१/१८ आर्म ॲक्ट कलम ३(२५) मु.पो.ॲक्ट कलम ३७(१)सह, कलम १३ अन्वये गुन्हा दाखल करुन त्यांना गुन्ह्यात अटक करण्यात आली असुन त्यांचेकडून ३०,०००/-चे देशी बनावटी पिस्टल, ३०००/-किं.चे ६ जिवंत काडतुसे व ८०,०००/-रु.किं.ची एक यामाहा मोटार सायकल असा एकु १,१३,०००/-रु.चा मुद्देमाल हस्तगत करणेत आला. तसेच सदरचे दोन्ही आरोपी हे कारटेप चोरीचे गुन्ह्यातील पाही आरोपी असल्याचे निष्पन्न झाले आहे.

दोन्ही गुन्ह्यांचा समांतर तपास केला असता आरोपींनी चोरीतील एकुण २० कारटेप/म्युझिक सिस्टीम लपवुन ठेवलेले काढून दिल्याने हस्तगत करणेत आले आहेत. तसेच नमुद आरोपींनी इसम नामे- शौकत ईस्माईल कुरेशी वय-४५ रा गालाबाई चाळ, सी-१५ गुजर स्ट्रिट, भेंडी बाजार, मुंबई याला विकलेले एकुण २० कारटेप व म्युझिक सिस्टीम त्याचेकडून हस्तगत करणेत आलेले आहेत. तसेच गुन्हा करतेवेळी वापरलेली मारुती सुझुकी बलेनो कार नं-एम.एच.१४-एक्स-५०९८ किं.रु.७५,०००/-रु.ची तपासकाली जप्त करणेत आली आहे.

दाखल गुन्ह्यामध्ये एकुण ४ आरोपी अटक असुन सदरचे आरोपी पोलीस कस्टडीत आहेत. आरोपींकडून सर्व मिळुन ४,६३,०००/-रु.चा मुद्देमाल.हस्तगत करण्यात आलेला असुन विश्रांतवाडी-५,हडपसर-१, येरवडा-२, दिघी-१,खडकी-१, सांगवी-२ असे एकुण १२ कारटेप चोरीचे गुन्हे उघडकीस आलेले आहेत. तसेच गुन्ह्याचा अधिक तपास चालु आहे.

सदरचा गुन्हा मा.श्री दिपक साकोरे, पोलीस उपआयुक्त, परि-४, पुणे व मा.श्री गणेश गावडे, सहा.पो.आयुक्त, खडकी विभाग, पुणे यांचे मार्गदर्शनाखाली संगीता पाटील, वरिष्ठ पोलीस निरीक्षक,व श्री दिलीप शिंदे, पोलीस निरीक्षक(गुन्हे) यांचे देखरेखखाली पोलीस उपनिरीक्षक विशाल मोहिते, अभिजीत चौगुले हे तपास करीत असुन पोलीस कर्मचारी उत्तम कदम, सुनिल खंडागळे,प्रफुल्ल मोरे, सुभाष आव्हाड, प्रविण भालचिम, विनोद मुधोळकर, किशोर दुशींग, प्रतिम जंगम, शेखर खराडे, अशोक शेलार,विनायक रामाणे, वामन सावंत यांनी कामगीरी केली.

